महंमद रफी ... तू कहीं आसपास है दोस्त



३१ जुलै हा महंमद रफींचा स्मृतीदिन. गेल्या शतकातील या महान गायकाच्या अविस्मरणीय गीतांची ही एक झलक म्हणजे त्यांना वाहिलेली स्वरांजली...

□ अजित पोपट

अमिताभ बच्चनच्या समोर हॉट सीटवर बसलेल्या तुम्हाला प्रश्न विचारण्यात आलाय की, 'गेल्या शतकात असा कोण पार्श्वगायक झाला ज्याने के. एल. सायगल आणि मल्लिका-ए-तरन्नूम, नूरजहाँबरोबर गीतं गायली, तशी तलत मेहमूद आणि किशोरकुमारसाठीही सूर लावला?'

या प्रश्नाच्या उत्तरासाठी ऑप्शन्सची गरज आहे? मुळीच नाही. कारण या प्रश्नाच्या उत्तराला पर्यायच नाही. याचं उत्तर एकच, महंमद रफी. या नावालाही एकप्रकारचं महत्त्व आहे. इस्लाम धर्माचे संस्थापक पैगंबरांचं नाव महंमद होतं. आणि अरबी भाषेत रफी या शब्दाचा अर्थ आहे श्रेष्ठ, उत्तुंग! इतकं पवित्र आणि समर्पक नाव धारण करणारे महंमद रफी यांचं कर्तृत्वही निर्विवादपणे श्रेष्ठ होतं. मखमली.' हळुवार स्वरांतील महंमद रफींची गीतं आजही आपल्या मनात रुंजी घालतात.

२४ डिसेंबर १९२४ रोजी पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यातील कोटला सुलतानसिंह येथे हाजी हली महंमद नावाच्या एका मध्यमवर्गीय मुस्लिम गृहस्थाच्या घरी महंमद रफींचा जन्म झाला. त्यांच्या आईचं नाव होतं अल्लारख्खी. भावंडांमध्ये यांचा नंबर सहावा. पण ज्याच्या सुरात सात स्वरांनी आपणहून हजेरी लावली आणि लहान वयात संगीताची जाण दिली असा हा घराण्यातला पहिलाच मुलगा.

लहानपणापासूनच महंमदला संगीताचा नाद होता. पंजाबी लोकसंगीत गुणगुणणं ही तर नित्याची बाब. शाळेतही शिक्षणाकडे लक्ष कमी तर बाहेरून कानावर येणाऱ्या सुरांवर लक्ष जास्त. भजन-कीर्तन गाणारे फकीर काय किंवा शेतावर काम करताना तोंडाने पारंपरिक गीतं गाणारे शेतकरी काय, महंमद त्यांची गाणी मन लावून ऐकत राही. अशा या छांदिष्ट मुलाची त्याच्या आई-वडिलांना नेहमी काळजी लागून राहिलेली असायची. पण मोठा भाऊ हमीद खाँचं मात्र महंमदवर निरतिशय प्रेम. दोन्ही भावंडांच्या आयुष्यात एक घटना अशी घडली ज्यामुळे हमीदने महं... जीवनाला कलाटणी दिली.

ब्रिटिश राजघर... ...व्या जॉर्जचा राज्याभिषेक सो... इंग्लंडमध्ये थाटामाटात साजरा हात... ... भारतातही ठिकठिकाणी या निमित्ताने समारंभ आयोजित करण्यात आले होते. असाच एक समारंभ लाहोरला संपन्न झाला. त्याप्रसंगी तत्कालीन सर्वश्रेष्ठ गायक आणि अभिनेता सैगलसाहेब हजेरी लावणार होते. काही कारणास्तव सैगल साहेबांना समारंभाच्या ठिकाणी पोहोचायला उशीर झाला. उपस्थित मंडळी वाट पाहून कंटाळली तेव्हा हमीद खाँनी आयोजकांना विनंती केली आणि लहानग्या महंमदला स्टेजवर उभं केलं. महंमदला काय, तेच हवं होतं. त्याने सूर लावला आणि क्षणार्धात उपस्थितांचा गोंधळ शांत झाला. बघता बघता लोक भान

हरपून त्याचं गाणं ऐकू लागले. खुद्द सैगल त्या ठिकाणी पोहोचले तेव्हा आयोजक महंमदला थांबवण्यासाठी पुढे सरसावले. त्यांना खुणेने अडवत सैगल म्हणाले, 'गाने दो उसे, बहोत अच्छा गाता है!'

कार्यक्रम संपल्यावर सैगलनी स्वत: महंमदची पाठ थोपटली आणि म्हणाले, 'खुदाने तुला विलक्षण गळा दिलाय. पुढे जाता तू खूप मोठा गायक होशील. नियमित रियाज चालू ठेव.'

रियाज तर चालूच होता. त्या काळी पट्टीचे गायक समजले जाणारे अब्दुल वहीद खाँ, उस्ताद बडे गुलाम अली खान (मोगले आझम फेम) आणि पंडित जीवनलाल मट्टू यांनी महंमदच्या सुरांना वळण लावलं. सैगलचा आशीर्वाद फळला. १९४१मध्ये *गुलाबलोचन* या पंजाबी चित्रपटासाठी संगीतकार श्यामसुंदर यांनी महंमदला पार्श्वगायनाची संधी दिली. गाण्याचे बोल होते, सोणियेनी हिरीयेनी तेरी याद ने बडा सताया...' या चित्रपटाचा नायक होता प्राण. याच श्यामसुंदरने महंमद रफींना पहिल्यांदा हिंदी चित्रपटातही गाण्याची संधी दिली. चित्रपटाचं नाव होतं- *गांव की गोरी*.

दरम्यान मुंबईत नौशाद नावाचे नवे संगीतकार चांगलेच नावारूपाला आले होते. महंमदच्या बडे भैयाने परत चक्रं फिरवली. नौशादच्या वडिलांना गाठलं. त्यांच्याकडून महंमदसाठी शिफारसपत्र मिळवलं आणि तडक मुंबई गाठली. नौशादला भेटून चिठ्ठी दाखवली. नौशादने त्यांना कोरसमध्ये गायला सांगितलं. 'हिंदोस्तां के हम है हिंदोस्तां हमारा...' नंतर *शाहजहा* चित्रपटात सैगलबरोबर एक ओळ गायची संधी दिली. गीत होतं, 'मेरे सपनों की रानी रुही...'

त्यानंतर शेवटच्या श्वासापर्यंत रफींना कधीच गाण्यातून उसंत मिळाली नाही. कलाकार आणि संगीतकार यांच्या तीन तीन पिढ्यांसाठी कंठ देणारा गायक म्हणून त्यांचं कौतुक करता येईल. रफींना एक दोन नाही तर सहा वेळा फिल्मफेअर ॲवॉर्डने पुरस्कृत करण्यात आलं. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, त्यावेळी ॲवॉर्ड विकत घेणं किंवा फिक्सिंगसारख्या अपप्रवृत्ती लोकांना माहीतही नव्हत्या.

रफींची रेंज, आवाजातील माधुर्य, टीपेत गायची तयारी आणि गीतातून शब्दांतील भाव जिवंत करण्याची शक्ती अलौकिक होती. रेंज याचा अर्थ हार्मोनियमच्या डावीकडच्या पहिल्या पट्टीपासून उजव्या बाजूच्या शेवटच्या पट्टीपर्यंत स्वर लावण्याची क्षमता. टीपेचा सूर लावतानाही रफींच्या चेहऱ्यावर कधीच ताण दिसायचा नाही. अगदी लीलया ते आवाजातील चढ-उतार साधू शकत.

'ए दिल है मुश्कील जीना यहाँ, जरा हट के जरा बच के...' (*सीआयडी*), 'सर जो तेरा चकराये या दिल डुबा जाये...' (*प्यासा*), 'मेरा यार बना है दुल्हा और फूल खिले है दिल के...' (*चौंदवी का चाँद*) ऐकल्यावर तुमच्या लक्षात येतं की ही गाणी जॉनी वॉकरवर चित्रित करण्यात आली होती. तर 'चौदवी का चाँद हो या आफताब हो...' (*चौदवी का चाँद*), 'इस भरी दुनिया में कोई भी हमारा न हुआ...' (*भरोसा*) या गीतांबरोबर गुरू दत्तचा चेहरा नजरेसमोर येतो. 'तारीफ करू क्या उसकी जिसने तुम्हे बनाया...' (*काश्मीर की कली*), 'चाहे कोई मुझे जंगली कहे...' (*जंगली*) ऐकताना शम्मी कपूरची खास नृत्यशैली आठवते. अशी किती उदाहरणं द्यायची? १९५० आणि १९६०च्या दशकातील सगळे नायक, चरित्र नायक, विनोदवीर, खलनायक या सगळ्यांसाठी रफीने गीतं गायली आणि नुसतीच गायली नाही तर आज इतक्या वर्षांनंतरही ती गीतं ऐकताना नजरेसमोर त्या कलाकाराचा चेहरा उभा राहावा अशी ती यादगार केली. म्हणजेच गाताना ते स्वत:ची ओळख विसरून कलाकाराशी एकरूप होत गात.


हळव्या मनाचा गायक

दोन गायकांची सुरीली भेट


वेगवेगळ्या कलाकारांना आवाज देणारे रफी वेगवेगळ्या शैलीत गीतं गात. प्रेमगीत, पारिवारिक संबंधविषयक गीत, राष्ट्रभक्तीपर गीत, गझल, भक्तिगीत, बिदाईगीत, भावगीत सगळ्या प्रकारची गाणी त्यांनी आपल्या खाती नोंदली आहेत. गाण्याची पार्श्वभूमी, प्रसंग, कलाकार या सगळ्या पैलूंचा विचार करून त्यानुसार रफी आपला स्वर लावत. कल्याणजी तर नेहमी त्यांना हर फन मौला (प्रत्येक कलेत पारंगत, म्हणत.

'चाहे कोई मुझे जंगली कहे...' हे शम्मी कपूरवर चित्रित केलेलं गीत आणि जितेंद्रच्या पहिल्याच चित्रपटातील 'मस्त बहारों का मैं आशिक...' ही दोन्ही गीतं अल्लड प्रेमगीतं. पण तरीही ती गाताना कलाकार वेगळे आहेत याचं भान ठेवून रफीने ती वेगळ्या ढंगात गायली आहेत. दोन्ही कलाकारांची आयडेंटिटी त्यांनी जपली आहे.

शास्त्रीय संगीत आणि भक्तीपर गीतांत रफींची बरोबरी करणं कोणालाही शक्य नाही. बैजू बावरासारख्या संगीतप्रधान चित्रपटाचं सोडाच. पण 'इन्सान का मंदिर है ये भगवान का घर है...' (*अमर*), 'आना है तो आ राह में कुछ फेर नही है...' (*नया दौर*), 'सुख के सब साथी दुख में ना कोई...' (*गोपी*) ही त्यांच्या भजनांची उदाहरणं. 'मधुबन में राधिका नाचे रे...' (*कोहिनूर*), 'नाचे मन मोरा मगन धिकता धीगी धीगी...' (*मेरी सुरत तेरी आँखे*), 'एक शहनशाह ने बनवा के हसी ताजमहल...' (*लीडर*) अशी शास्त्रीय संगीतावर

आधारित गीतंही त्यांच्या खाती आहेत.

लेखाच्या सुरुवातीला म्हटलं तसं तलत मेहमूद आणि किशोरकुमारसाठी रफीने कोणती गीतं गायली? किशोरकुमारच्या रागिणी (१९५८) आणि शरारत (१९५९) मध्ये रफीने किशोरकुमारसाठी मन मोरा बावरा (ओ. पी. नय्यर) आणि अजब है दास्तां तेरी अय जिंदगी (शंकर जयकिशन) ही गाणी गायली. तर तलत मेहमूदसाठी 'तेरे हुस्न का फसाना (१९५८, खय्याम) म्हटलं. नूरजहाँबरोबर जुग्नू चित्रपटासाठी १९४७मध्ये 'यहाँ बदला वफा का बेवफाई के सिवा क्या है...' (संगीत फिरोज निजामी) गीत गायलं होतं.

महंमद रफींचा स्वभाव अतिशय उदार, नम्र असा होता. एखादा नवा गीतकार-संगीतकार किंवा निर्माता त्यांच्याकडे पार्श्वगायनाची विचारणा करत आला तर ते शकुनाचा अवघा एक रुपया घेऊन त्यांच्यासाठी गाणं म्हणत. खुद्द रफीने आयुष्यातल्या चढ-उतारांना तोंड दिलं आहे. राजेश खन्नापासून किशोरकुमारचा उदय झाला आणि रफी हे नाव थोडं विस्मृतीत गेलं. पण ते काही काळापुरतंच. नंतर पुन्हा या कलाकाराची ऊर्जितावस्था आली. ऋषी कपूर स्वतःच्या कारकीर्दीतली सगळ्यात यादगार कव्वाली असा जिचा उल्लेख करतो ती 'परदा है परदा...' आणि 'शिरडीवाले साईबाबा...' (दोन्ही *अमर अकबर ॲन्थनी*) ही गीतं रफींनी अजरामर केली.

लोकप्रियतेच्या शिखरावर असतानाही रफीने कधीच नवोदितांना फटकारलं नाही. महेंद्र कपूर आजही ही गोष्ट मान्य करतात की, मला रफीसाहेबांचं पाठबळ नेहमी मिळालंय. तसंच *बाबुल* चित्रपटासाठी आधी रफी गाणार होते. पण तलत मेहमूदला चांगली संधी मिळणं आवश्यक होतं. रफी स्वतःहून बाजूला झाले आणि 'छोड बाबूल का घर...' तलत मेहमूदना मिळालं.

अशाच पद्धतीने नेहमी दुसऱ्याला मदतीचा हात पुढे करणं हा त्यांचा स्वभाव होता. सुमारे अर्धा डझन तरी संगीतकारांनी आपल्या कारकीर्दीचा श्रीगणेशा रफीपासून केला असेल. शंकर जयकिशन (बरसात), मदन मोहन (*जुना आँखे*), रवी आणि राजेंद्रकुमार (*वचन*), कल्याणजी आनंदजी (सम्राट चंद्रगुप्त), उषा खन्ना (*दिल देके देखो*), लक्ष्मीकांत प्यारेलाल (*छैलाबाबू*, *दोस्ती*) आणि आर. डी. बर्मन (*छोटे नवाब*), बैजू बावरामधली रफीची गीतं ऐकून पं. नेहरूंनाही गहिवरून आलं होतं.

जगातल्या कोणत्याही प्लेबॅक सिंगरला मिळाला नसेल असा दुर्लभ सन्मान रफींना एका गीतासाठी मिळाला आहे. चित्रपट *दुलारी* (१९४९) मध्ये संगीतकार नौशादसाठी रफींनी गायलेलं 'सुहानी रात ढल चुकी ना जाने तुम कब आओगे...' पापुआ न्यू गीआना नावाच्या एका छोट्याशा देशात राष्ट्रीय गीतांत या गीताला स्थान मिळालं आहे. तर पद्मश्री, दोन राष्ट्रीय पुरस्कार आणि सहा फिल्मफेअर पुरस्कार मिळवून रफींनी आपली कारकीर्द देदीप्यमान केली होती. नॅशनल ॲवॉर्ड मिळवून देणारी गीतं होती 'बाबुल की दुआएं लेती जा...' (चित्रपट *नीलकमल*, संगीत रवी) आणि 'क्या हुआ तेरा वादा...' (*हम किसी से कम नहीं*, संगीत आर. डी. बर्मन)



बैजू बावरासाठी राज कपूरला रफींचा स्वर

सहा सहा वेळा फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळाल्यानंतर खुद्द रफींनीच विनंती केली की बस्स, आता दुसऱ्या गायकांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करा. रफींना पहिला फिल्मफेअर ॲवॉर्ड १९६०मध्ये *चौदवी का चांद* चित्रपटाच्या शीर्षक गीतासाठी मिळाला. नंतर 'तेरी प्यारी प्यारी सूरत को किसी की नजर ना लगे...' (ससुराल, संगीत शंकर-जयकिशन, १९६१), चाहुंगा मैं तुझे सांज सवेरे (दोस्ती, लक्ष्मीकांत-प्यारेलाल, १९६४), 'मैं गाऊ तुम सो जाओ...' (ब्रह्मचारी, शंकर-जयकिशन, १९६८), 'क्या हुआ तेरा वादा...' (हम किसी से कम नहीं, आर. डी. बर्मन, १९७७) हा त्यांना मिळालेला शेवटचा फिल्मफेअर ॲवॉर्ड. पुढे किशोरकुमारचं नाव होऊ लागलं. ही गोष्टही सूचक आहे. याशिवाय रफींनी सुमारे अडीचशे गैर फिल्मी गीतं गायली आहेत. त्यात गझल, भजन, राष्ट्रभक्तीपर गीतं यांचा समावेश आहे. हिंदीबरोबरच गुजराती, मराठी, पंजाबी, सिंधी, अवधी, आसामी, भोजपुरी, छत्तीसगढी, बंगाली, मगधी, राजस्थानी, उडिया, तामीळ तेलगू, कन्नड, मारवाडी वगैरे भाषांतूनही त्यांनी गैर फिल्मी गीतं गायली आहेत.

आपल्या आयुष्यातलं शेवटचं गीत त्यांनी २८ जुलै १९८० रोजी गायलं. आणि तीनच दिवसांनी ३१ जुलैला त्यांचं देहावसान झालं. *आसपास* चित्रपटासाठी लक्ष्मीकांत प्यारेलालच्या संगीतात त्यांनी गायलेलं अखेरचं गीत होतं...

'तेरे आने की आस है दोस्त
शाम क्यूं उदास है दोस्त
महकी महकी फिजा यह कहती है
तू कही आसपास है दोस्त!'

*अमर अकबर ॲन्थनी*ची 'परदा है परदा...' ही कव्वाली म्हणजे रफींच्या आवाजातली यादगार अदाकारी

